MHTH270078372023

**Cri.M.A./200/2023**

**<u>आदेश नि. क. १ वर</u>**

**<u>क्रिमी. एम.अे. नं. २००/२०२३</u>**

१. यातील अर्जदार यांच्या विधिज्ञाने यातील सहा. समाजकल्याण आयुक्त, ठाणे यांनी यातील पिडीत हीला The Scheduled Caste & Scheduled Tribes ( Prevention of Atrocities ) Act, 1989 या कायदयाअंतर्गत अर्ज दाखल केलेला असुन, तीच्या मागणीच्या अनुषंगाने काय कारवाई केली आहे, हे कोर्टास सादर केलेले नाही. या ठिकाणी असे दिसुन येते की, नि. ४ प्रमाणे कोर्टाची नोटीस ही सहा. समाज कल्याण आयुक्त, ठाणे यांना बजावणी झाली असल्याचे दिसुन येते.

२. अर्जदाराच्या विधिज्ञांनी मा. सर्वोच्च्य न्यायालयाचे क्रीमी. अपील नं. ३४९/२०२१ हा केस लॉ सादर केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये सहा. समाज कल्याण आयुक्त,ठाणे यांना शो कॉज नोटीस काढण्यात येत आहे की, त्यांनी यातील अर्जदार यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने काय कारवाई केली आहे. सदरची माहीती त्यांनी अदयाप पावेतो का सादर केलेली नाही, याचा खुलासा देखील मागविण्यात येत आहे व त्यांनी सदरची माहीती ही पुढील तारखेपर्यंत या न्यायालयास सादर करावी, म्हणजेच दि. १९/०९/२०२४ पर्यंत सादर करावी.

ठिकाण : बेलापुर ( पी. अे. साने )
दिनांक : २८/०८/२०२४ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बेलापुर